**CNR No. MHNS18000173-2011**

जिभाउ राघो भामरे

विरूध्द

रामदास रावबा बच्छाव, इतर

नियमीत दरखास्त क.२६/२०११

## निशाणी ५० खालील आदेश.

दरखास्तदार/वादीने प्रस्तुतचा अर्ज प्र.वादी त्यांना जमिन वहिती करण्यांस हिल्लाहरकत करीत असल्याने पोलिस मदत मिळावी तसेच ऋणको/प्र.वादीला पकडुन आणुन दिवाणी तुरूंगात ठेवावे याकरीता दाखल केला आहे. सदर अर्ज दरखास्तदाराने प्रतिज्ञापत्रावर दाखल केला आहे.

०२. ऋणको/प्र.वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करून विरोध केला आहे. ऋणको/प्र.वादीचे कथन असे की, सदर दरखास्त खोटी असुन प्रस्तुतचा अर्ज दरखास्तीचे कामकाज लांबवीण्याच्या उद्येशाने केले आहे. प्रतिवादीने हरकत केल्याचे वादीच्या उलटतपासातील मजकुर पाहता, सिध्द झालेले नाही. वादीचा कब्जा व पिकपेरा असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. देवळा पोलिस ठाणे येथे असलेल्या नातेवाईकांचा वापर करून दरखास्तदार वादी प्रतिवादीला वेळोवेळी दमदाटी करीत आहे. वादीने त्याचे क्षेत्र प्रतिवादीला विकावे आणि स्थलांतरीत व्हावे, नाहीतर त्याला खोटया केसमध्ये अडकवुन तुरूंगात टाकण्याची धमकी देत आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास वादी पोलिसांशी हातमिळवणी करून प्र.वादीला त्याच्या मालकीच्या क्षेत्रातुन बेदखल करण्याची शक्यता आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केली आहे.

०३. दोन्ही पक्षांतर्फे वि.वकीलांचा त्यांच्या पावीत्रयाप्रमाणे युक्तिवाद केला. तसेच, प्रस्तुतकामात आजपर्यंत झालेला पुराव्याचे अवलोकन केले. ऋणको/प्रतिवादीने त्याचे नि.क्र. ३० खालील उलटतपासात हे म्हणणे खरे आहे की, आजपर्यंत मी माझे ताब्यातील क्षेत्राची वहिती करून त्यातुन

उत्पन्न घेतो, अशी कबुली दिली आहे. परंतु, पुढे त्याने हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे ऋणको/प्रतिवादी हा माझे क्षेत्राला कधीही हरकत करीत नव्हता व नाही, असेही कथन केले आहे. सदरची दरखास्त ज्या रे.मु.क्र. ३५/२००८ मध्ये दाखल झाली, त्याचा हुकूमनामा दिनांक १३/१२/२०१० रोजी झालेला असुन प्रस्तुतची दरखास्त ८ मार्च २०११ रोजी दाखल झाली आहे. सदर दाव्यात दरखास्तदार/वादीला गट क्र. १०६३/१ मधील १२ आर क्षेत्राचा मालक असल्याचा ठराव झाला असुन त्याचे कब्जास हरकत न करण्याची निरंतर ताकीद दिली आहे. या संदर्भात वादी/दरखास्तदाराने दाखल केलेले दिवाणी अपील क्र. १८९/२०११ नामंजुर करण्यात आले असुन दिनांक ०५/०८/२०१५ रोजी दरखास्तदार/वादीने दिलेला नि.क्र. ४ चा अर्ज देखील रद्य करण्यात आलेला आहे. ऋणको/प्रतिवादीने मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाविरूध्द अपील दाखल केले असल्याचे त्याचे कथन नाही. वादीने यापुर्वी देखील असे अर्ज दाखल केलेले आहेत. या संदर्भात नि.क्र. ३५ चा तंटामुक्ती अध्यक्ष, वाखारी यांचा अर्ज देखील पाहण्यात आला. त्यामध्ये त्यांनी ऋणको/प्रतिवादी हा दरखास्तदार/वादी यांना वहीती करण्यांस हरकत करीत असल्याचे नमुद केले आहे. सन २०१० साली झालेला पहीला निकाल व दिनांक ३१ जुलै २०१३ रोजी झालेला मा.जिल्हा न्यायालयाचा दुसरा निकाल होउन सहा वर्ष उलटुनसुध्दा वादीस हुकूमनाम्याची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. ऋणको/प्रतिवादीने नेमकी कधी हरकत घेतली याचा तपशिल किंवा स्वतंत्र पुरावा अभिलेखावर आलेला नसला, तरी हरकत घेतली ही बाब दरखास्तदार/वादीतर्फे वारंवार दाखल होणारे अर्ज व तंटामुक्ती अध्यक्षांचा अहवाल पाहता दिसुन येते. दरखास्तदार/वादीला हुकूमनाम्याची अंमलबजावणी होउन मिळणेकरीता आवश्यकता व मागणीप्रमाणे पोलिस मदत मिळणे आवश्यक आहे असे दिसते. त्याकरीता आवश्यक ती पोलिसांची संख्या व त्यांचा होणारा भत्ता हा दरखास्तदार/वादीला भरावा लागेल. ऋणको/प्रतिवादीने दरखास्तदार/वादीचे देवळा पोलिस ठाण्यात नातेवाईक

असल्याचे कथन केले असले, तरी त्यांची नांवे अगर पद दिलेले नाही. वादाकरीता त्याचे नातेवाईक आहेत असे जरी गृहीत धरले, तरी त्यामुळे हुकूमनाम्याची अंमलबजावणी टाळता येणार नाही. सदर सर्व परिस्थितीचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दरखास्तदार/वादीने संबंधीत पोलिस ठाण्यात अर्ज करून व विशेष भत्ता भरून आवश्यकतेप्रमाणे पोलिस मदत घ्यावी.

३. वादी/दरखास्तदाराची मागणी व उपलब्धतेनुसार संबंधीत अधिकारी यांनी पोलिस संरक्षण पुरवावे.

(स्वरा स.पारखी)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळवण ता.कळवण, जि.नाशिक.

दिनांक : ०६/०८/२०१९.
ठिकाण : कळवण.